# अंतिम वर्ष परीक्षा; मोबाईल क्रमांक, ई-मेल, परीक्षा पर्याय निवडण्याची १२ ऑक्टोबरपर्यंत मुदत

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा,** अंतिम वर्ष शेवटच्या सत्राच्या नियमित अभ्यासक्रमांच्या १७ ऑक्टोबरपासून सुरु होणार आहेत. त्याअनुषंगाने परीक्षेला बसणाऱ्या विद्यार्थ्यांनी मोबाईल कमांक व ई-मेल, ऑनलाईन, ऑफलाईन परीक्षेबाबतचा १२ ऑक्टोंबरपर्यंत सायंकाळी पाच वाजेपूर्वी योग्य तो पर्याय निवडावा, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाच्यावतीने करण्यात आले आहे. विद्यापीठ परीक्षा विभागाकडून परीक्षासंदर्भातील तयारी सुरु आहे. १३९ अभ्यासक्रमासाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातून सुमारे ७४ हजार विद्यार्थी परीक्षा देणार आहेत. ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप स्वत:चा मोबाईल कमांक व ई-मेल महाविद्यालय, अधिविभागामार्फत विद्यापीठ संगणक प्रणालीमध्ये अद्ययावत केलेला नाही. ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापही परीक्षा पध्दतीबाबत पर्याय निवडलेला नाही, अशा विद्यार्थ्यांनी दि.१२ पर्यंत पर्याय निवडणे आवश्यक आहे.

पुढारी

# शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

NAAC 'A' Grade

## जाहीर आवाहन

**(मार्च/एप्रिल, २०२० उन्हाळी सत्रातील अंतिम वर्ष/अंतिम सत्र परीक्षार्थी करिता)**

शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर संलग्नित महाविद्यालये/अधिविभागात प्रवेशित उन्हाळी सत्र मार्च/एप्रिल, २०२० मध्ये अंतिम वर्ष/अंतिम सत्रांची परीक्षा देणाऱ्या सर्व परीक्षार्थींना जाहीर आवाहन करण्यात येते की, ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप स्वतः चा मोबाईल क्रमांक व ईमेल महाविद्यालयामार्फत/अधिविभागामार्फत विद्यापीठ संगणक प्रणालीमध्ये (Online Exam. Portal) अद्ययावत केलेला नाही तसेच ज्या विद्यार्थ्यांनी अद्यापही परीक्षा पद्धतीबाबत (Online/Offline Exam.) पर्याय निवडलेला नाही अशा विद्यार्थ्यांनी दि. १२ ऑक्टोबर, २०२० रोजी सायं. ०५.०० पूर्वी योग्यतो पर्याय निवडण्यात यावा. अन्यथा अशा विद्यार्थ्यांना संबंधित महाविद्यालयामध्ये/अधिविभागामध्ये प्रत्यक्ष हजर राहून बहुपर्यायी पद्धतीने स्वरुपात परीक्षा देणे बंधनकारक राहील. सदरची सुविधा ज्या विद्यार्थ्यांनी उन्हाळी सत्र २०२० करिता रितसर परीक्षा फॉर्म शुल्कासह भरलेले आहेत त्यांचेसाठीच राहील. याची नोंद घ्यावी.

(गजानन पळसे)
प्र. संचालक
परीक्षा व मूल्यमापन मंडळ

दि. : ११.१०.२०२०
ठिकाण : कोल्हापूर

Kolhapur Edition
Oct 11, 2020 Page No. 9
newspaper.pudhari.co.in